International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय महिलांची स्थिती

**प्रा. डॉ. रमेष संभाजी. खंडारे**
सहा. प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख
जिजामाता कला महाविद्यालय,
दारव्हा, जि. यवतमाळ.

**सारांषः—**

देषा च्या विकासाची स्थिती पाहतांना पुरूश आणि महिला या दोन्ही घटकांचा विचार करणे गरजेचे ठरते. त्यामुळे महिलांच्या सर्वांगिन विकासा षिवाय भारत देषाचा विकास होणे षक्य नाही. आधुनिक काळात अगदी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापासून ते भारतीय संविधानातील विविध कलमात तरतुदी करून महिलांच्या विकासासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आले आहेत. असे जरी असले तरी अजूनही पाहिजे त्या प्रमाणात महिलांची प्रगती झालेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अजून व्यापक प्रमाणात महिलांच्या विकासासाठी सर्वांकडूनच प्रयत्न होणे गरजेचे आहे. भारतीय समाजात अजूही बऱ्याचषा वाईट रूढी, प्रथा परंपरा चालूच आहेत. या ना त्या कारणाने त्यांचे षोशण होत असल्याचे चित्र पाहवयास मिळते. महिला खऱ्या अर्थाने आर्थिक दृश्टया सक्षम झाल्याषिवाय त्यांचा सर्वागिन विकास होणार नाही. षिवाय जास्तीत जास्त महिलांना प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत सामिल करून घेणे गरजेचे ठरते.

**प्रस्तावना :—**

प्राचीन काळातील भारतीय समाजाचा आढावा घेतल्यास भारतीय समाजात महिलांचा दर्जा हा पुरूषांच्या बरोबरीने होता. असे लिखित साहित्यावरून स्पश्ट होते. उदा. वैदिक काळात (इ.स. पूर्व 600 वर्षेपर्यंत) स्त्रियांचा दर्जा हा मानसन्मानाचा व प्रतिष्ठेचा होता. त्यानंतर उत्तरकालीन स्मृतिकाळ (इ.स. पूर्व 1040 पर्यंत) सामाजिक व धार्मिक संक्रमणतेचा काळ म्हणून या काळात स्त्रीयांचा दर्जा हा अतिषय कनिष्ठ होत गेला. त्यानंतर 19 व्या षतकामध्ये समतावादी विचारसरणीचा व मूल्यांचा प्रभाव पडून त्यामध्ये स्त्रियांना अनेक अधिकार व हक्क देण्यात आलेत. उदा. राजा राममोहन रॉय यांनी 1829 मध्ये ब्राह्यो समाजाच्या माध्यमातून 'सतीप्रथ' बंद केली. आर्य समाजाने बालविवाह प्रथा, पडदा प्रथा बंद केली. तसेच 1856 विधवा पुनर्विवाह अधिनियम 1872, 'स्त्री संपत्ती/धन संपत्ती' नियम आणि 1955 मध्ये 'हिंदू विवाह कायदा' 1956 मध्ये 'वारसा हक्क कायदा' 1961 मध्ये 'हुंडा प्रतिबंधक कायदा' अषा अनेक कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांचा दर्जा व अधिकारामध्ये सुधारणा घडून आली. त्यानंतर सर्वात महत्वाचे म्हणजे भारतीय संविधानाच्या माध्यमातून जाणिव पूर्वक विविध कलमात अनेक तरतुदी करून महिलांचा सर्वांगिन विकास साधण्याला प्राध्यान्य देण्यात आले.

स्त्री हीच नवनिर्मिती करू षकते. निसर्गाने अषी षक्ती तिला बहाल केली आहे. स्त्री षिवाय पुरुष व पुरुषाषिवाय स्त्री हे दोघेही अपूर्ण आहेत. दोन्ही समाजाचे महत्वाचे आधारस्तंभ आहेत. एका राजकीय विचारवंताने अषी भूमिका मांडली की, " जर एखाद्या देषाची प्रगती मोजायची असेल, तर त्या देषातील महिलांची स्थिती व दर्जा कसा आहे. त्यांना कोणकोणते अधिकार आहेत. यावरून मोजण्यात यावेत." यावरून कोणत्याही देषात स्त्रियांच्या विकासाला किती महत्वपूर्ण स्थान आहे हे दिसून येते. हजारो वर्शापासून विषेशतः महिला आणि दलित वर्ग यांचे विविध हक्क, विकासाच्या संधी नाकारून त्यांचे जीवन कांही धर्ममार्तंडानी बंदिस्त करून टाकले होते. फारषी आर्थिक संसाधने त्यांना उपलब्ध होवू दिली नाहीत. तषी व्यवस्थाच जाणिवपूर्वक बनविण्यात आली होती. षिक्षणाच्याही संधी नाकारल्या होत्या. "चूल आणि मूल" याच बाबीत त्यांना बंदिस्त करून टाकले होते. परिणामी महिलांचा विकास झाला नाही. पण साधारणतः 19 साव्या षतकात मात्र कांही मानवतावादी मंडळीकडून, समाजसुधारकांकडून, संत महात्मे यांचेकडून स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यासाठी, त्यांना वेगवेगळे अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी, आणि समाजात जनजागृती करण्यासाठी भरीव प्रयत्न झाले आहेत. पण ख–या अर्थाने महिलांना विकासाची संधी भारतीय संविधान लागू झाल्यापासून मिळाली आहे. त्याला अनुसरून भारतीय स्वातंयानंतर महिलांची स्थिती नेमकी कषी आहे याचा आढावा प्रस्तूत संषोधन लेखातून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्देश :—**

1) स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्त्रीयांच्या स्थितीचा आढावा घेणे.
2) स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रीयांच्या स्थितीचा आढावा घेणे.
3) भारतीय संविधानातील महिला विशयक तरतुदींचा आढावा घेणे.
4) महिलांच्या कायदेविषयक बाबीचा आढावा घेणे.
5) महिलांची राजकीय, सामाजिक आर्थिक व धार्मिक स्थिती तपासणे.
(6) महिलासमोर नेमक्या कोण कोणत्या समस्या आहेत? त्याचा आढावा घेणे.

**गृहितके :—**

1) प्राचीन काळतील भारतीय महिलांची स्थिती व दर्जा चांगला असला तरी मध्यंतरीच्या काळात स्त्रियांचे वेगवेगळे हक्क नाकारून त्यांच्या विविध विकासाच्या संधी नाकारलेल्या होत्या. म्हणून स्त्रीया परावलंबी झाल्याचे चित्र दिसून येते.

2. देषात संविधान लागू झाल्यापासून महिलांचा दर्जा उंचावत आहे. भारतीय संविधानातील अनेक तरतुदी त्यांच्या विकासाला सहायभूत ठरत असल्याचे दिसून येते.

3) गेल्या 40 ते 50 वर्शात महिलांना विकासाच्या वेगवेगळया संधी मिळत असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात महिला महत्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे चित्र पाहवयास मिळते.

**संषोधन पध्दतीचे स्रोत व अध्ययन पध्दती:—**

प्रस्तुत षोध निबंधामध्ये दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, अभ्यासक्रमिक पुस्तके, विविध निवडणूकांचे वर्तमान पत्रातील संदर्भ, वेळोवेळी प्रसारमाध्यमातून, वेगवेगळया चर्चासत्रातून मांडलेली मतमतांतरे, प्रिंट मिडीयातून झालेल्या चर्चा, तसेच राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावरील परिषदा ,चर्चासत्रे व संषोधन पत्रिका, मासिकातून प्रकाषित झालेले अग्रलेख इ. स्त्रोतामधून माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. भारतीय समाजातील प्रथा, रूढी, परंपरा, चालीरिती, निरक्षरता, धर्माचा पगडा इत्यादींचा प्रभाव असल्यामुळे आणि त्यांच्या समस्यांचा विचार करून या शोधनिबंधात निदानात्मक, विष्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांना मिळालेले संरक्षण:—**

संविधानाच्या माध्यमातून विविध तरतुदी करून पुरूषाप्रमाणेच महिलांनाही वेगवेगळे हक्क उपलबध करून दिलेले आहेत. जसे की, नागरिकांचे मुलभूत हक्क, कर्तव्य, राजनित्तीची मार्गदर्षक तत्वे व इतर विविध तरतुदी मधुन स्त्री आणि पुरूषांना समान मानवाधिकार दिलेले आहेत. राज्यघटनेतील कलम 14 नुसार कायदयासमोर सर्वजन समान मानले आहेत. कलम 15 नुसार धर्म, जात, वंष, लिंग, जन्मस्थान या कोणत्याही कृत्रिम कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली आहे. कलम 16 नुसार सार्वजनिक सेवेमध्ये स्त्री आणि पुरूषांना समान संधी देण्यात आलेली आहे. कलम 17 नुसार अस्पृस्यतेवर बंदी, कलम 23 नुसार माणसांचा अपव्यापार, तथा खरेदी — विक्री करणे यावर बंदी, वेठबिगारी सारखी कामे सक्तीने करवून घेता येणार नाहीत. कुणालाही गुलाम किंवा दास समजून कामे लावता येणार नाहीत. तर कलम 24 नुसार 14 वर्षाच्या आतील मुलां—मुलींना धोक्याच्या व अवजड ठिकाणी कामाला लावता येणार नाही. राजनित्तीच्या मार्गदर्षक तत्वामधील कलम 39 क नूसार उपजिविकेची साधने मिळविण्याचा स्त्री आणि पुरूषाना समान अधिकार असेल. कलम 39 ब नुसार स्त्री आणि पुरूषाना समान कामासाठी समान वेतन दिले जाईल. तर कलम 44 नुसार समान नागरी कायदा कलम 51 ई नुसार मूलभूत कर्तव्यामधून स्त्रियांच्या विकासाला मारक ठरणाऱ्या अनिष्ठ चाली—रिती, प्रथा, यावाईट प्रवृत्तीचा त्याग करणें. कलम 325 नुसार कोणतीही व्यक्ती धर्म, जात, वंष, लिंग, पंथ, षिक्षण, प्रदेष या कारणावरून मतदार यादीत नाव समाविष्ठ होण्यास अपात्र असणार नाही. यासारख्या कितीतरी तरतुदीमधून भारताची राज्यघटना महिलाना संरक्षण पुरविते.

**महिलांची आर्थिक स्थिती :—**

जगातील विषेषतः आषिया खंडातील राष्ट्रात तर गरिबीचे प्रमाण फारच जास्त आहे. त्यांची कमाई प्रतिदिन दोन डॉलर पेक्षाही कमी आहे. त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता सुध्दा होताना दिसून येत नाही. भारतात तर पुरूष व महिलांना कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. पण प्रत्यक्ष समाजात असे चित्र दिसून येते की, आर्थिक बाबतीत महिलांना पुरूषांच्या तुलनेत फारच कमी वेतनावर काम करावे लागते. महिलांना दुय्यम दर्जाची कामे

करावी लागतात. असुविधापूर्ण वातावरणात कामे करावी लागतात, कामाच्या ठिकाणी ब-याच वेळा लैंगिक षोषनाला, अत्याचाराला बळी पडावे लागते.

**महिलांची आरोग्यविषयक स्थिती :–**

मानवाधिकाराच्या सनदेतील कलम 25 नुसार प्रत्येक व्यक्तिला आपले राहणीमान व दर्जा कसा ठेवायचा याचा अधिकार आहे.? असे असले तरी स्त्रियांच्या आरोग्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते, कारण भारतात पितृसत्ताक कुटूबं पध्दती असल्यामुळे सकस, ताजे, चांगले पोषणयुक्त अन्नं मुलांना किंवा पुरूषाना, उरलेले षिळेपाते अन्न मुलींना/स्त्रियांना त्यामुळेही महिला वेगवेगळया साथीच्या आजाराला बळी पडतात. षिवाय देवदेवतांच्या नावाखाली उपास–तापासही महिलांच्याच वाटयाला जास्त आहेत. तसेच लहान वयात लग्न मग लवकरच मातृत्व, इ. समस्येमुळे महिलांचे आरोग्य अत्यंत बिकट होत आहे. वरील अनेक बाबीतून महिलांच्या मानवी हक्काचे फार मोठया प्रमाणावर हनन होत आल्याचे चित्र पाहवयास मिळते.

**स्त्रियांवरील अत्याचाराची सद्यस्थिती:–**

म. फुले, राजर्षी षाहु महाराज, गाडगे महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अभिमानाने वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात, षिवाय पुरोगामी म्हणून आपली ओळख सांगणाऱ्या महाराष्ट्रात, तथा भारत देषात महिलावरील होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे प्रमाण वरचेवर वाढत असल्याचे चित्र पाहवयास मिळते. महाराष्ट्रात आजही बालमजुरी, कौटुंबिक हिसांचार, हुंडाबळी, बालकामगार, स्त्रिभ्रूणहत्या, छेडछाड, विनयभंग, बलात्कार, वेष्या व्यवसायात जबरदस्तीने ढकलणे, अनन्वीत अत्याचार अषा घटना दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वरचेवर वाढतच आहेत. भारतात 75 टक्के महिला घगुती छळाला बळी पडतात, दर अर्ध्या तासाला एका महिलेवर बलात्कार होतो, दर दहा मिनिटाला एक महिला आत्महत्या करते. अत्याचाराचे प्रमाण पुर्वी 7 टक्के होते ते आता 11 टक्के इतके झाले आहे. दवाखाण्यात पैसे भरले नाहित म्हणून गरोदर मातेला दवाखाण्याच्या बाहेर काढणे, नंतर तीच्या बाळाचा मृत्यू होणे, ब-याचषा आदिवासी महिला आजही फारषा व्यवस्था नसल्यामुळे चालत बरेच अंतर दवाखाण्यात जाणे, या घटना मनाला सुन्न करणाऱ्या आहेत. थोडक्यात भारत देषात महिलांवरील अत्याचाराची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीयांच्या सामाजिक परिस्थितीत झालेला बदल :–**

पारंपरिक भारतीय समाजात चार भिंतीच्या आत राहणारी महिला आज सामाजिक, राजकिय, आर्थिक क्षेत्रात पदार्पण करून आपला ठसा उमटवत आहे. षिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय महिलामध्ये जागृती झाली. आर्थिक क्षेत्रातील पदार्पन, संपत्तीत तसेच घटस्फोटाचा वैधानिक आधीकार मिळाल्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीत ब-याच प्रमाणात सुधारणा झाली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मुलींच्या संदर्भात भारतीय समाजात वैचारिक परिवर्तन होऊन व्यापक बदल झाला. स्वातंत्र्यानंतर मुलांच्या तुलनेत मुली जास्त क्रियाषिल, कर्तव्यदक्ष झाल्यामुळेच त्यांच्या सामाजिक स्थितीत जास्त प्रमाणात बदल झालेला दिसून येतो.

**स्थान आणि भूमिकेत झालेला बदल :–** स्वातंत्र्यानंतरचा वाढता षिक्षणाचा प्रसार आणि पाष्चिमात्य विचार प्रणालीमुळे महिलांच्या सामाजिक परिस्थितीत पूर्णपणे बदल झालेला दिसून येतो. पतिच्या घरी एके काळी दासी समजली जाणारी महिला आज दासी न राहता सहचारिणी बनली. ती अबला न राहता सबला बनली. त्यामुळे पतिकडील स्थान आणि भूमिका या दोन्ही बाबतीत परिवर्तन होऊन मान–सन्मानाची समान हिस्सेदार बनली आहे.

**विविध क्षेत्रातील पदार्पण :–** स्वातंत्र्यानंतर ज्या प्रमाणात भारतीय समाजात अमुलाग्र परिवर्तन झाले. त्याप्रमाणेच भारतीय स्त्रीयांच्या एकंदर परिस्थितीत बदल झालेला आहे. शैक्षणिक प्रसारामुळे त्यांना एक वेगळे महत्वाकांक्षी वातावरण निर्माण झाल्यामुळेच आज भारतीय स्त्रीने शासकीय विभागात उच्च पदापर्यंत मजल मारली आहे. एवढेच नव्हे, तर आजच्या महिलांनी वैज्ञानिक, राजकीय, पत्रकार, लेखिका, कवयित्री, डॉक्टर, इंजिनियर, समाजसुधारक, षिक्षणक्षेत्र अषा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व स्थापन केले आहे. आर्थिक क्षेत्रातील विभिन्न उद्योग, व्यवसायात पदार्पण करून एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. अषा प्रकारे महिलांचा आर्थिक सहभाग दिवसेंदिवस वेगाने वाढत असून अन्य क्षेत्रातही आपले वर्चस्व सिध्द करून सामाजिक, राजकीय व्यावसायीक सहभागामुळे त्यांच्या जीवनाला विविध आयाम मिळाले आहे.

**महिला सबलीकरणासंदर्भातील विविध कायदे :–**

स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात समान संधी मिळावी याकरिता महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी करण्यात आलेले कायदे व निर्माण केलेली यंत्रणा आहे.

1.) महिलांना राजकारणात सहभागी होण्यासाठी समान मताधिकार कायदा–1952.

2.) द्विभार्या प्रतिबंधक कायदा–1955.

3.) वारसा हक्क कायदा–1956.

4.) घटस्फोटाचा कायदा–1956.

5.) पोटगी कायदा –1956.

6.) वेष्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा–1956.

7.) विधवा पुनर्विवाह कायदा –1956.

8.) अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा–1956–1986.

9.) गर्भपात कायदा –1971.

10.) गर्भजल परिक्षण कायदा–1988.

11.) हुंडा प्रतिबंधक कायदा –1961–1986.

12.) बलात्कार प्रतिबंधक कायदा –1983.

13.) समान वेतन कायदा –1976.

14.) प्रसूती लाभाचा कायदा –1961.

15.) सती प्रतिबंधक कायदा –1929.

16.) मुस्लिम घटस्फोट कायदा –1939.

17.) चलचित्र कायदा –1952

18.) स्त्री अष्लीलता प्रतिबंधक कायदा–1986.

19.) छेडछाड प्रतिबंधक कायदा –1978.

20.) मातृत्व लाभ कायदा –1961.

21.) राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम–1990.

22.) प्रसवपूर्व लिंगनिदान तंत्र आणि दुरूपयोग प्रतिबंध कायदा–1994.

23.) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा–2005.

असे अनेक कायदे बनवले आहेत, ज्यामुळे महिलांना संरक्षणाबरोबरच निर्भयतेने जीवन जगण्याच्या परिस्थितीत उत्तरोत्तर सुधारणा होत आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय स्त्रीयांच्या दयनिय स्थिती विरोधात अनेक आंदोलन झाल्यामुळेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांना सबल, सक्षम बनविण्यासाठी अनेक कायदे केले गेलेत. सर्वप्रथम 1929 च्या कायदयासाठी बालविवाह करणे हा गुन्हा ठरविला आहे. 1978 मध्ये ह्या कायदयात सुधारणा करून विवाह वयात वाढ करण्यात आल्यामुळेच त्यांच्या सामाजिक विकासाला बळकटी आली. 1955 चा हिंदू विवाह कायद्याच्या कलम 5 (1) किंवा (2) नुसार बहुविवाहाला आळा बसला असून स्त्री ही केवळ उपभोगाचे साधन आहे ह्या विचाराला तडा बसला. इंग्रजकालीन 1856 च्या विधवा पुनर्विवाह कायद्याने विधवा विवाहाला मान्यता मिळाल्यामुळे कठोर बंधनातून महिलेला मुक्तता तर मिळालीच षिवाय विधवांची स्थिती सुधारण्यास मदत झाली. भारतीय संविधान कायदा 1874 नुसार स्त्रीला संपत्ती विषयक अधिकार प्रदान करण्यात आला. अधिनियम 1874 नुसार विवाहीत महिलांना संपत्ती विषेश अधिकार दिला गेला. अधिनियम 1954 च्या विषेष विवाह कायद्यानुसार जर पती व्यभीचारी किंवा पत्नीबरोबर कृरतापूर्ण व्यवहार करीत असेल तर पत्नी त्याविरूध्द घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज सादर करू षकते. तसेच 1956 च्या हिंदू उत्तरदायित्व अधिनियमाद्वारे मुलांबरोबर मुलींनाही कौटूंबिक संपत्तीमध्ये समान हिस्सेदारी मिळाली. प्रत्येक विधवेला आपल्या मृत पतीच्या संपत्तीवर अधिकार असल्याचे मान्य करण्यात आले. भारतीय संविधान 1956 च्या कायद्याद्वारे निपुत्रिक महिलांना मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याचा अधिकार प्रदान केला असून मुलांबरोबरच मुलींनाही संपत्तीचा समान वाटेकरी म्हणून घोषित केले आहे. 2 ऑक्टोंबर 1985 च्या हुंडा प्रतिबंधक कायदयाने हुंडा देणे आणि घेणे हा सामाजिक अपराध मानला गेला.

अशा प्रकारे भारतीय महिलांना कायदेविशयक अधिकार मिळाल्यामुळे त्यांच्या स्थितीत अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. परंपरावादी समाजात की जी शारिरीक, भौतिक, सामाजिक, मानसिक शोशणाची षिकार बनली होती अषी सर्व परिस्थिती बदलून महिलांच्या विकासाचे द्योतक असले तरी आजची भारतीय महिला आधुनिकता आणि परंपरेच्या संदर्भात आपली स्थिती आणि भूमिका अषा द्वंद्व संघर्षाच्या चक्रात गुरफटलेली दिसून येते. त्यामुळे या द्वंद्वाला समर्थपणे तोंड देऊन पारंपरिक, सामाजिक रूढी, प्रथा, परंपरांना छेद देऊन स्वतः विकसित होईल तरच ती खऱ्या अर्थाने समाज विकासाला हातभार लावू शकेल. एवढेच नाही तर संपूर्ण समाज विकासाच्या प्रक्रियेत तिला सक्रिय भूमिका वाढवावी लागेल.

**निष्कर्ष व उपाययोजना :–**

1. महिलांना षिक्षणाच्या जास्तीत जास्त सोई – सुविधा उपलब्ध करून देवून त्यांना उच्चषिक्षित बनवून त्यांच्या राहणीमान व जिवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी खऱ्या अर्थाने सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.
2. महिलांना आजही या ना त्या कारणाने दुय्यम वागणूक दिली जाते, त्यामुळे ही मानसिकता बदलून महिलांना चांगली, विवेकपूर्ण वागणूक देण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक केला पाहिजे., मुली तोकडे कपडे घालते, जिन्स पॅन्ट घालते. म्हणून तिच्यावर अत्याचार होतात ही मानसिकता बदलवणे गरजेचे आहे.
3. महिलांना राजकारणात, षासकीय नोकऱ्यात आरक्षण देवून धोरणे ठरविणे, निर्णय घेणे या प्रक्रियेत सामावून घ्यायला हवे. जोपर्यत महिला स्वतः धोरणे ठरवित नाहित, निर्णय घेत नाहीत तोपर्यंत त्यांना पुरूषाच्या निर्णयावर अवलंबून रहावे लागेल. त्यामुळे ते स्वतः धोरण निर्माते झाले पाहीजेत.
4. महिलांवरील षोषन व अत्याचार थांबविण्यासाठी बरेचषे कायदे अस्तित्वात आहेत. पण ते फक्त कायदे न राहता त्या सर्व कायदयाची कठोरपणे प्रत्यक्षात अमलबंजावणी झाली पाहिजे. महिलांना त्वरीत न्याय मिळाला पाहिजे.
5. समाजात प्रचलित असलेल्या अनेक वाईट चालिरीतीवर प्रतिबंध घालून अंधश्रदा निमूर्लनाचा कार्यक्रम प्रभावीरितीने राबविण्याची आवष्यकता आहे.
6. धर्मभेद, जातीभेद, पाळणारे, धर्मांधता वाढविणारे, स्वार्थासाठी, सत्ताप्राप्तीसाठी नको ते मुद्ये उकरून काढून धार्मिक सलोखा बिघडवणारे यांच्यावर कडक कार्यवाही झाली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने महिलांच्या हक्काचे जतन होवू षकते.

संपूर्ण जग इंटरनेटमुळे जवळ येत असले तरी माणूस मात्र माणसापासून दूर जात आहे ही वस्तुस्थिती आहे . माणूस भौतिक, चंगळवादी विकृतीच्या जाळयात अडकून बेगडी संस्कृतीचे ढोंग करीत आहे. अगदी सुषिक्षित समाज सुध्दा जात, धर्म, वंष, लिंग, प्रदेष, षिक्षण भाषा, प्रादेषिकता यांची आव्हाने उभी करून स्त्री – पुरूष चालीरिती रूढी, प्रथा, परंपरा, अमानवी, व्यवहाराची षिकवण घेत आहेत. सामाजिक अन्याय निर्माण करणाऱ्या अनेक वाईट अमानवी प्रथा परंपरा नष्ट करणे आवष्यक आहे. यासाठी समाजपरिवर्तन घडून आले पाहिजे लोकांच्या वृत्तीमध्ये बदल घडवून आला पाहिजे. समाज

विकासाचा प्रवास हा महिला षिवाय होणारच नाही. तर महिला ही समाज विकासाची पथदर्षी म्हणावे लागेल. बदलत्या सामाजिक परिस्थितीत पारंपरिक रूढी, प्रथा परंपरांना तिलांजली देऊन स्वतःचा विकास करण्यास सामर्थ्यवान बनावे यातच त्यांचा आणि राष्ट्राचा विकास आहे.

**संदर्भ सूची :-**

(1) रा.ज.लोटे, भारतीय घटनात्मक तरतुदी, पिंळापूरे ॲन्ड कं. पब्लिषर्स, नागपूर.

(2) पाटील प्रा. व्ही.बी. : मानवी हक्क, के.सागर प्रकाषन, पुणे आवृत्ती 2014

(3) चव्हाण प्रा.अभिषेक, लेख. मानवाच्या सर्वांगीन विकासासाठी मानवी अधिकाराचे महत्व, अल्फा पब्लिकेषनः नांदेड. वर्ष 2011.

4) माधवी कवी : ''महिला कल्याण आणि विकास'' नागपूर विद्या प्रकाषन

5) लाडे प्रा. जयमाला : ''स्त्री भृणहत्त्या – एक सामाजिक समस्या, सोषल इष्युज अँड प्रॉब्लेमस् टवसए छव 01 श्रनद दृ 2012